SDF–B–MRTH

मराठी (प्रश्न-पत्र–II)

(साहित्य)

वेळ : तीन तास | कमाल अंक : 250

प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात

आठ प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

MARATHI (PAPER—II)

(LITERATURE)

Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 250

QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

Please read each of the following instructions carefully before attempting questions

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

Optional Province · optionalprovince.com

SECTION—A

1. पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादकपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) या उपरि मागौतें कामाइसीं म्हणितलेंः 'भटो रावो मरैलः आणि मातें आगीआंतु घालीतीलः' भटोबासीं म्हणितलेंः 'तरि तुम्ही आपुला आदि भावो चुकवा.' 'मग ते बळाधिकारें घालीतीलः' 'तरि तुम्हां आत्महत्येचें नरक नाहींः' इतुलेनि ते उगीचि राहिलीः मग कांहीं पदार्थ आणिला होताः तो भटोबासांसि संपादिलाः मग आज्ञा घेउनि गावां गेलींः॥ मग कितीका दिसां रावो निवर्तलाः मग तेहीं तैसेंचि केलेंः बहुतापरि उवापुला आदिभावो चुकवीला.

(b) ''तर मग बरोबर! आम्ही तरी त्यांना संतच समजत होतो.''
विश्वासनं चपापून त्याच्याकडं पाहिलं. चर्या तर सद्‌भावयुक्त दिसत होती!
''कोणाला?'' संदर्भ विसरून विश्वासनं विचारलं.
''तुमच्या वडिलांना हो! मौज अशी की, तेसुद्धा दुःखातच मेले!''
सदाशिवरावांनी किंचित हसून उत्तर दिलं.
''त्यात मौज कोणती दिसली तुम्हांला?'' कासावीस होत विश्वासनं विचारलं.

(c) पुढं शेवंतीकडून बोलवत नसे. खांद्यावर डोळे कोरडवण्याखेरीज ती काहीच करत नसे. हे बघून कवेतल्या अनंताला काय वाटे, तोच जाणे! मायकडे पाहता पाहता एक दिलखुलास उसळी मारून तो हसू लागे. शेवंती त्याच्याशी बोले, ''काऽय हासतं बेलमा! माया जिवाची काई फिकर आये तुले? उद्या मेली मंजे दिसते ना देव! थांब जरा; मंग हासजो-काय हासतं तं! जातं कुठीसा?''
हेच पण थोड्याफार फरकानं आजही झालं.

(d) नाल मारण्यासाठी फास टाकून बैल जसा उलथा करतात, तसा दामूच्या उद्‌गारानं गाव उलथा झाला. करीमचाचातील प्रामाणिक माणूस कंठ फोडून ओरडला—''ए कभी होगा नहीं, मैं ऐसा सत्यानास होनेकू दुंगा नहीं.'' त्यासाठी दामूला दुणता करण्यासाठी जगन्नाथ वेताळ होऊन उठला. त्याच्या डोळ्यात वीज चमकून गेली, त्याची भुवई सळसळून दुभंग झाली, दात करकरले, खालच्या ओठाने अंग ताणले, हंटर गरगरत कडे ओलांडून दामूकडे येऊ लागला-लक्ष्या पुजारी रागानं मारुतीचे पाय ओरबाडू लागला.

(e) जसजसा मोठा होत चाललो तसतसा शाळा नसली म्हणजे लोकायसंग गुड खुडायला व नंतर नंतर पिवळा कापायला जायला लागलो. गुड खुडणे एकदाचे सोपे पण पिवळा कापणे जरा कठीण. कारण जरा धाट धांडाळ फिडाळ असलं तर कधी कधी धाट न कापून विळा हातावर किंवा पायावर येयाचा. विळ्याने व धांडाळ धाटाच्या चिवटीने हाता पायाचे बोटं अनेक वेळा कापून रक्त नसतानाही बाहेर आल्यामुळे खूप आग झाल्याचे व चिघळू नये म्हणून जखमजोडीचा पाला लावल्याचे आठवते.

2. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'महात्मा फुले यांनी ब्राह्मण्य मानसिकतेच्या वर्णवर्चस्वाविरुद्ध जो ऐतिहासिक संघर्ष केला' त्याची 'सार्वजनिक सामधर्म' या ग्रंथाच्या माध्यमातून ओळख करुन द्या. 15

(b) 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीच्या कथानक रचनेचे वैशिष्ट्ये सोदाहरण नोंदवा. 15

(c) प्र० के० अत्रे यांच्या 'साष्टांग नमस्कार' मधून दिसणाऱ्या विनोदी शैलीचे वेगळेपण नोंदवा. 20

3. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'स्त्रीला सातत्याने दुय्यम स्थानी ठेवण्यामागे प्रस्थापित पुरुषप्रधान व्यवस्थेची मनोभूमिका कारणीभूत आहे' या विधानाची 'एकेक पान गळावया' या गौरी देशपांडे लिखित कादंबरीच्या आधारे चिकित्सा करा. 15

Optional Province · optionalprovince.com

(b) 'शिळान' या कथासंग्रहातील संवादांच्या वेगळेपणाची सोदाहरण मांडणी करा. 15

(c) 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनामध्ये प्र. ई. सोनकांबळे यांनी आपल्या बहिणीचे जे व्यक्तिचित्रण केलेले आहे, त्यातील वैशिष्ट्यांचा धांडोळा घ्या. 20

4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) ''आचार्य अत्र्यांची नाटके हा मराठी रंगभूमीच्या आणि विनोदी साहित्याच्या विकासातला महत्त्वाचा टप्पा आहे.'' साधार स्पष्ट करा. 15

(b) 'जन हे वोळतु जेथे' या कादंबरीमध्ये शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी केलेले विविध प्रसंगांचे चित्रण कसे प्रभावी ठरते? त्याविषयी चर्चा करा. 15

(c) जातिप्रथेला सुरूंग लावणाऱ्या बाबूराव बागूल यांच्या 'जेव्हा मी जात चोरली होती' या कथेतील वास्तवतेची दाहकता स्पष्ट करा. 20

SECTION—B

5. पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादकपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) ''टाकी उपानह पदें अति मंद ठेवी।
केली विजार वरि डौरहि मौन सेवी॥
हस्तीं करी वलय उंच अशा उपायीं।
भूपें हळूच धरिला कलहंस पायीं॥''

(b) ''ब्रह्मांडाची सदाफूली। अक्षयते मध्ये फुलली
फुले तिची बघता नयनी। वेड भरुनि अंतःकरणी
फूलपाखरे परोपरी। निर्वेधपणे फुलांवरी
जशी स्वये तरलित होती। मंद तरल गंधावरती
तेवि जगाच्या फुलांवरी। गंध दाटले परोपरी
अनुभवुनी हर्षित व्हावे। सुखदुःखे चुंबित गावे''

(c) ''अंधाराचा काळा हत्ती
पृथ्वीपुढे झुलतो आहे
पायांखाली काय दडे?
नरबलीचे प्रेत सडे;
तुझी-माझी धाव आहे
दातापासून दाताकडे.''

(d) ''आणि दोस्तहो!
मी पाहतो आहे
एक क्षुब्ध नवागत गतीचे टोक धरून
लिहितो आहे;
हे शब्द हटवा... हे पुतळे... स्थितिस्थापक.
हवा आहे मनासारखा नवा जाहिरनामा म्हणून.
नवा जाहिरनामा म्हणून.''

Optional Province · optionalprovince.com

(e) ''हा एक हृदय-कापणीचा हंगाम
समाप्तीच्या अगोदरची ही ऑक्टोबरची हीट
मऊशार लुसलुशीत काळोखात अश्रुचं चकाकणं
नियतीच्या आसाभोवती फिरणारा घोडा
मी ठोकून बसलोय मांड त्यावर
चल मेरे घोडे टिक् टिक् टिक्
मला हे सारंच ढकलायला हवं पुढं...''

6. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) ''शाहिरांच्या लावण्या वाचू लागलो म्हणजे पेशवेकाळाच्या अखेर अखेर आढळणाऱ्या रंगेलपणाचे, सुखविलासी वृत्तीचे, बेफिकीरपणाचे दर्शन आपणांला अधिक होते.'' या विधानाचे ऐतिहासिक व वाङ्मयीन साधर्म्य, वैधर्म्य नोंदवा. 15

(b) बालकवींना 'सृष्टीचा गायक' हे अभिधान कसे समर्पक ठरते ते त्यांच्या कविता ओळींच्या संदर्भाने स्पष्ट करा. 15

(c) 'दमयंती स्वयंवर' या काव्यातील अलंकारयोजनेची विविधता सोदाहरण स्पष्ट करा. 20

7. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'विशाखा' या काव्यसंग्रहाच्या आधारे कुसुमाग्रजांच्या प्रतिभासामर्थ्याचे महत्त्व विशद करा. 15

(b) 'या सत्तेत जीव रमत नाही' या काव्यसंग्रहात नामदेव ढसाळ यांच्या काव्यानुभवाचा विकास सामाजिकतेकडून आध्यात्मिकतेच्या दिशेने झालेला आहे काय? या विषयी साधक बाधक चर्चा करा. 15

(c) 'मृद्‌गंध' या कवितासंग्रहातून विंदा करंदीकर यांच्या समाजनिरीक्षणातील विविधता कशी प्रत्ययास येते, ते सोदाहरण सांगा. 20

8. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'संध्याकाळच्या कविता' या काव्यसंग्रहात ग्रेस यांनी विविध वृत्तांचा आणि मुक्तछंदाचा वापर करून आपले रचनाकौशल्यावरील प्रभुत्व कसे प्रदर्शित केले आहे, त्याची सोदाहरण चिकित्सा करा. 15

(b) नामदेवांच्या काव्यजाणिवेतील भावनिष्ठतेचे सोदाहरण विवेचन करा. 15

(c) 'जाहिरनामा' या काव्यसंग्रहाच्या आधारे, नारायण सुर्वे यांनी नाट्यगीत या काव्यप्रकाराला नवे परिमाण कसे दिले, त्याची चर्चा करा. 20

★ ★ ★

Optional Province · optionalprovince.com